आरोग्य सेवा

जा क्र उसंआसे/शुश्रुषा/टि-३/प्रशिक्षण/ 233-35 /०५
उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे-१
दिनांक :- 4 जानेवारी, २००५.

प्रति,
चेअरमन,
सौ.देवीबाई नारायणदास छाबडा,
ग्रामीण शिक्षण संस्था, सातारा

विषय :- नर्सिंग प्रशिक्षणार्थींना अनुभवासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राकडे परवानगी मिळणे बाबत....

संदर्भ :- १.या कार्यालयाचे पत्र जा क्र उसंआसे/आस्था/टि-३/प्र.प/३०७५८/०४, दिनांक १८ डिसेंबर, २००४
२. आपले पत्र जा क्र २२१/०४, दिनांक ३१.१२.२००४.

उपरोक्त संदर्भ क्र (१) च्या पत्रानुसार सौ.देवीबाई नारायणदास छाबडा, ग्रामीण शिक्षण संस्था, सातारा यांना त्यांचे संस्थेतील नर्सिंग प्रशिक्षणार्थींना अनुभवासाठी प्राथमिक आरोग्य केद्राकडे परवानगी देणेबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांना मा.महासंचालक, आरोग्य सेवा मुंबई यांचे दि.१९.७.२००० च्या पत्रान्वये सूचीत करण्यात आले होते.

संदर्भ क्र (२) च्या पत्रानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये नर्सिंग प्रशिक्षणार्थींना अनुभव मिळणेबाबतची परवानगी उप संचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे या कार्यालयाकडून घेणेबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांनी सूचीत केलेचे कळविले आहे.

त्याअनुषंगाने खालील अटींवर आपल्या संस्थेस प्राथमिक आरोग्य केद्र, लिंब/चिंचणेर/कन्हेर/परळी, जि.सातारा येथे विद्यार्थ्यांच्या ट्रेनिंगसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

त्याअनुषंगाने आपणास सोबत जोडलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून वरील नमुद प्राथमिक आरोग्य केद्रामध्ये आपल्या संस्थेतील प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यास परवानगी देण्यात येत आहे.

सोबत अटी व शर्ती

उप संचालक,
आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे-१

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी
वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, लिंब/चिंचणेर/कन्हेर/परळी, जि.सातारा.
प्रत माहितीस्तव
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा.